Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# उर्मिला पवार यांचे वाङ्मयीन योगदान

**डॉ. रमेश नामदेव माने,** मराठी विभाग, प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर, जि. जळगाव

**प्रास्ताविक**

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यात अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्यातही कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र इत्यादी वाङ्मय प्रकार अधिक समृध्द बनलेले दिसतात. १९६० च्या आसपास मराठी साहित्यामध्ये आमुलाग्र बदल झालेला दिसतो. हा बदल साहित्याच्या प्रयोजनात आणि स्वरुपात झालेला दिसतो. त्यामुळे साहित्यात प्रकट होणाऱ्या आशयात, मांडणीत वास्तव जीवनाचा आविष्कार होऊ लागला.

या साहित्याच्या परिवर्तनाला महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांची वैचारिक जाणीव कारणीभूत असलेली दिसते. त्याचा परिणाम म्हणजे ग्रामीण साहित्य, दलित साहित्य निर्माण झाले. त्यामुळे मराठी साहित्याचा चेहरा मोहराच बदलला. या प्रकाराच्या साहित्य निर्मितीमुळे मराठी साहित्य कल्पनारम्यतेकडून किंवा रंजनात्मकतेकडून वास्तवतकडे वळले. गोंडस, लोभसपणा, प्रतिमा, प्रततीकांच्या भाषेऐवजी भीषण वास्तव साकार करणारी भाषा पुढे आली. आदर्श किंवा रोमँटिक विषयाऐवजी जीवनातील वास्तव प्रश्नच साहित्याचे विषय बनले. आत्मकथनाच्या प्रवाहात जे जगले, भोगले, जाणवले, त्याचे चित्रण करण्यावर भर दिला जाऊ लागला. त्यामुळे ग्रामीण, शहरी जीवनाचे चित्रण येऊ लगले. कांदबरीच्या क्षेत्रातही बनगरवाडी, टारफूला, पाचोळा, धग, माहिमची खाडी, सूड यासारख्या साहित्यकृती निर्माण झाल्या. या साहित्यकृतीतून वेगवेगळया भागातील आणि वेगवेगळया स्तरातील जीवनाचे चित्रण साहित्यात आले. तसेच समाजातील सामाजिक घटकांचे प्रतिबिंबही साहित्यात येऊ लागले. एकंदरीत साहित्याचे आशयक्षेत्र व्यापक बनले. दलित साहित्याने त्याच्यात मोलाची भर टाकली आणि मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले.

साहित्य क्षेत्रातील परिवर्तनास भारतीय स्वातंत्र्य आणि भारताने स्वीकारलेली घटना या गोष्टीही कारणीभूत आहेत. कारण घटनेने मान्य केलेली तत्त्वे , लोकशाही मूल्ये, यामुळेही जीवनाच्या परिक्षेत्रात बदल होऊ लागला तसाच तो साहित्यातही झाला. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, या तत्त्वाचा अंगीकार केल्यामुळे लेखकांनीही लेखनाचे, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य स्वीकारले आणि स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय मूल्यांसाठी लेखन होऊ लागले. व्यक्ती स्वातंत्र्याची भावना प्रबळ होऊ लागली. त्यामुळे स्वतःच्या जीवनातील दुःख प्रकट केले जाऊन नव्या मूल्यासाठी धडपडणारे जीवन प्रकट होऊ लागले. त्यामुळे जुन्या गोष्टींना विरोध करुन नवा विचार स्वीकारण्याचा चाललेला प्रयत्न साहित्यामध्ये प्रकट होऊ लागलेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा परिणाम तत्कालीन समाजावर झाला आणि याच प्रेरणेतून दलित साहित्य निर्माण झाले. डॉ.आंबेडकरांनी सर्व प्रकारच्या गुलामगिरीला व शोषणाला, शोषण करणाऱ्या मानसिकतेला नकार दिला, विरोध केला. प्रस्थापित चातुर्वर्ण्य व्यवस्थेला आव्हान दिले. व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. सामाजिक समतेचा आग्रह धरला. दलित समाजाला नवे भान प्राप्त करुन दिले.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

मानवतेवर श्रद्धा प्रकट केली. तर्कशुद्धता, बुद्धिनिष्ठा, अंधश्रद्धेला विरोध, व्यक्ती पुजेस विरोध अशी चतुःसूत्री सूचविली. शोषण, अस्पृश्यता, अंधविश्वास, अन्याय, अत्याचार या विरुद्ध लढा, संघर्ष देण्याची मानसिकता निर्माण केली. समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, विज्ञाननिष्ठा, व्यक्ती प्रतिष्ठेवर भर दिला आणि त्यातून दलित साहित्याची उभारणी केली. नकार, विद्रोह, संघर्ष, नवसमाज निर्मिती, नवमूल्यांची जोपासना करण्यासाठी दलित साहित्य निर्माण झालेले आहे.

आंबेडकरांच्या प्रेरणेतून, तत्त्वविचारातून दलित साहित्याची निर्मिती झाली आणि त्यातून दलित साहित्याचा अस्सल, जिवंत, जोरदार ताकदीचा प्रवाह मराठी साहित्यात सामील झाला. त्यात कथा, कविता, कादंबरी आणि आत्मकथन हे वाङ्मय प्रकार अतिशय गतीशीलतेने पुढे आले.

दलित आत्मकथनाचा प्रवाह लक्षात घेतला तर, अनेक गाजलेली आत्मकथने दिसतात. त्यात- दया पवार यांचे बलुतं, प्र.ई.सोनकांबळे- आठवणींचे पक्षी, शंकरराव खरात- तराळ-अंतराळ, उत्तम बंडू तुपे- काट्यावरची पोटं, लक्ष्मण माने- उपरा, नानासाहेब झोडगे- पांजर, लक्ष्मण गायकवाड- उचल्या, दादासाहेब मोरे- गबाळ, पार्थ पोळके- आभरान, माधव कोंडविलकर- मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, शरणकुमार लिंबाळे- अक्करमाशी, नरेंद्र जाधव- आमचा बाप आन् आम्ही, भगवान इंगळे- ढोर, किशोर शांताबाई काळे- कोल्हाट्याचं पोर, गंगाधर लांडगे- गावकुसाबाहेरचं जिणं, भीमराव गस्ती- बेरड, आत्माराम राठोड- तांडा इत्यादी.आहेत.

या पुरुष आत्मकथनाबरोबर स्त्रियांनीही आत्मकथने लिहिली असून काही आत्मकथने खूप गाजलेली आहेत. शांताबाई कांबळे यांचे (माझ्या जल्माची चित्तरकथा) बेबी कांबळे (जिणं आमुचं), जनाबाई गि-हे (मरणकळा), मुक्ता सर्वगोड (मिटलेली कवाडे), कुमुद पावडे (अंतःस्फोट) नजुबाई गावीत (आदोर) मल्लिका अमरशेख (मला उध्वस्त व्हायचंय!) संध्या रंगारी (चांदणचूरा) शांताबाई दाणी (रात्रंदिन आम्हा) इत्यादी आत्मकथने होत. या सर्व आत्मकथनात तत्कालीन व्यक्तिगत अनुभव, समाजदर्शन, सांस्कृतिकता यांचे दर्शन प्रत्ययाला येते.

याच आत्मकथनांच्या परंपरेतील वाङ्मयीन आणि सामाजिकदृष्ट्या गाजलेले आत्मकथन म्हणजे उर्मिला पवारांचे 'आयदान' होय. हे आत्मकथन २००३ मध्ये प्रकाशित झाले आणि सर्व समीक्षकांचे त्यांनी लक्ष वेधले. 'आयदान' हे एक दलित स्त्रीचे आत्मकथन आहे तसेच ते एक सामाजिक व सांस्कृतिक ठेवाही आहे. या आत्मकथनात 'उर्मिला पवार' यांनी आपली आत्मकथा प्रकट केली आहे. लेखिका उर्मिला पवार यांचे वाङ्मयीन योगदानावर चर्चा करता येईल.

उर्मिला पवार या मराठी साहित्यातील आघाडीच्या लेखिका आहेत त्यांनी कथा प्रवासवर्णन एकांकिका आणि आत्मकथन या वाङ्मय प्रकारात लेखन केले आहे त्यांचे आयदान हे आत्मकथन विशेष लक्षणीय आणि बहुचर्चित ठरले आहे. उर्मिला पवारांचे साहित्य हे सामाजिक बांधिलकी मांडणारे असून त्यांनी सामाजिकतेवर लक्ष केंद्रित केले आहे त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय संवेदनशील आहे त्यांची भाषा सामाजिक प्रश्नांना महत्त्व देणारी, त्यांच्या मुळापर्यंत जाणारी सच्चे भावविश्वाचे दिग्दर्शन करणारी आहे वाचकांच्या अंत:करणाला जाऊन भिडणारी वाचकाला अंतर्भूत करणारी जशी आहे, तशीच विचारप्रणवशीलही आहे.

**उर्मिला पवार यांची साहित्य संपदा**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

उर्मिला पवार यांनी 'सहावे बोट, चौथी भिंत, हातचा एक, असे तीन कथासंग्रह लिहिले आहेत. 'इलास पाहुण्यांनू बसा बसा' व 'मुक्ती' अशा दोन एकांकिकांचे लेखन केले आहे. शिवाय 'मॉरिशस : एक प्रवास' हे एक प्रवासवर्णन नाही लिहिले आहे. तर 'उदान' हे भाषांतरित पुस्तक लिहिले आहे. 'आम्हीही इतिहास घडवला' हा संशोधनात्मक ग्रंथ त्यांच्या नावावर आहे, तर आयदान हे त्यांचे लोकप्रिय ठरलेले आत्मकथन आहे.

अशा विविध वाङ्मय प्रकारात लेखन केले आहे त्यांच्या साहित्याला महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार, अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार, कोकण मराठी साहित्य परिषदेचा वाङ्मय पुरस्कार, प्रियदर्शन अकॅडमी पुरस्कार, पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार, मातोश्री भिमाबाई आंबेडकर पुरस्कार, क्रांतीज्योती फुले पुरस्कार, दलितमित्र पुरस्कार, असे अनेक मानाचे पुरस्कार त्यांना लाभले आहेत. त्यांच्या कथा आणि आत्मकथनाचा अनेक शालेय अभ्यासक्रमासह विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झाला आहे. त्यांचे आयदान या आत्मकथनाचा इंग्रजी भाषेतही अनुवाद झाला आहे त्याचबरोबर त्यावर नाट्यरूपांतरही झाले आहे असे विविध सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत.

**उर्मिला पवार यांच्या साहित्याचे स्वरूप**

उर्मिला पवार यांनी विविध पुरस्कार, प्रकारातून लेखन केले आहे. विविध वाङ्मय प्रकाराच्या आधारे त्यांच्या लेखनाचे स्वरूप आणि आशयाचा शोध घेता येईल.

**कथा वाङ्मय**

उर्मिला पवार यांनी सहावे बोट, चौथी भिंत  हातचा एक, असे तीन कथासंग्रह त्यांनी लिहिले आहेत. त्यांच्या कथा शोषित, पीडित, उपेक्षित व्यक्तींच्या आयुष्यातील एखाद्या घटनेभोवती गुंफलेल्या आहेत. विविध व्यक्तींच्या आयुष्यात त्यांच्या वाट्याला आलेली वेदना आणि अवहेलना त्यामध्ये एकवटलेली जाणवते. त्यांच्या बहुतेक कथा स्त्रीच्या व्यथा-वेदना मांडणाऱ्या आहेत. त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा आपल्यावर होणारा अन्याय निमूटपणे सोसणाऱ्या नाहीत. त्यांना त्या अन्यायाची जाणीव आहे. म्हणून त्या विरुद्ध वागण्याची त्या धडपड करतात.

उर्मिला पवार यांच्या कथा नायिकांना पुरुषप्रधान संस्कृतीमुळे अन्याय आणि नाकारलेपणाचे आयुष्य जगणे भाग असले तरी पुरुषसत्तेच्या विरोधात उभी राहण्याची आणि स्वत्व जपण्याची त्यांची आंतरिक ऊर्मी समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने उचललेले पाऊल आहे. असे मानले जाते. अभिव्यक्तीच्या दृष्टीने जाणवणारी या कथांची अभिव्यक्ती व निवेदनाबरोबर संवादातून झालेली आहे. संवादाच्या माध्यमातून अवघ्या काही शब्दात एखाद्याची व्यक्तिमत्त्व चखलपणे उभे राहण्याची उभे करण्याची हातोटी उर्मिला पवार यांनी साधली आहे पांढऱ्या पेशा मध्यमवर्गीय माणसाच्या भाषेइतकीच गावाकडील रांगडी. शिवराळ भाषा त्या सहजतेने वापरू शकतात. त्यामुळे अनुभवाच्या निवेदनात कुठेही रटाळपणा जाणवत नाही. त्यामुळे त्यांची कथा पसरट न होता टोकदार आणि वाचकांच्या मनाला जाऊन भिडते.

म्हणून "उर्मिला पवारांचा एक प्रतिथयश कथा लेखिका म्हणून उल्लेख केला जातो त्यांच्या सर्वच कथासंग्रहातून, कथांमधून स्त्री,दलित स्त्री, दलित वर्ग यांच्या समस्या त्यांनी परखडपणे मांडल्या आहेत. त्यांच्या कथांचे मूल्यमापन केल्यास त्यांच्या सुरुवातीच्या काही व्यक्तिरेखा सहनशील आहेत, परंतु नंतर या व्यक्तिरेखा बदलत गेल्या त्या व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या विरांगणा बनल्या आपल्या वाट्याला आलेल्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

दास्याचा दुःखाचा बाजार न मांडता त्या सर्वशक्तीनिशी नवी व्यवस्था मांडू पाहतात. धर्म, जातीव्यवस्था. धर्मग्रंथ, रूढी-परंपरा या सर्वांनाच नाकारून माणूस मूल्य स्वीकारतात. त्यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा केवळ पुरुषी व्यवस्थेपासून समानतेची मागणी करीत नाही तर एकूणच नवीन अशी आधुनिक समाजरचना अपेक्षितात. ज्वलंत अनुभवाबरोबर कल्पना आणि प्रतिभासामर्थ्याने विकसित झालेली त्यांची कथा आंबेडकरी चळवळीचा आणि मराठी साहित्याचा परिघ समृद्ध करणारी आहे."(१) असे आयदान : सांस्कृतिक ठेवा या ग्रंथात डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांनी म्हटले आहे.

**कथांची वैशिष्ट्ये**

१. उर्मिला पवारांनी आपल्या कथेतून स्त्रियांच्या विविध प्रश्नांना केंद्रभूत ठेवून वाचा फोडण्याचे काम केले आहे.
२. त्यांच्या अनेक कथा स्त्री मनाची स्पंदने टिपणाऱ्या असून त्या कथांना वास्तवतेचा पाया लाभलेला आहे.
३. त्यांच्या कथा केवळ दलित स्त्री जीवनावरच आधारलेल्या नाहीत तर दलित स्त्रियांबरोबर मुस्लिम समाजातील स्त्रियांचे जीवन त्यांची भावविश्व साकार करणाऱ्या आहेत.
४. उर्मिला पवारांच्या कथेत दलित जाणीव अतिशय प्रखरतेने मांडली आहे.
५. उर्मिला पवारांच्या कथांमधील पात्र लक्षवेधी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत.
६. लेखिकेचे अनुभवविश्व सर्व अंगप्रत्यांगासह साकार झाले आहे.
७. सूक्ष्म निरीक्षण, समर्थ भाषाशैली, चिंतनशीलता, संवेदनशीलता, इत्यादी त्यांच्या कथांची वैशिष्ट्ये जाणवतात.

**मॉरिशस : एक प्रवास** (प्रवास वर्णन)

उर्मिला पवार यांनी कथात्म साहित्याबरोबर प्रवासवर्णनही लिहिले आहे. मॉरिशसला दुसऱ्या जागतिक मराठी परिषदेसाठी गेले असतानाचे प्रवासवर्णन या पुस्तकात केले आहे तेथील आलेले अनुभव त्यांनी मॉरिशस : एक प्रवास या पुस्तकात मांडले आहेत. या प्रवासवर्णनात विमानाला पहिलाच प्रवास असल्याने त्यांना त्यासंदर्भात उत्सुकता होती उंच गेल्यावर मनातून टिपलेले मुंबई नगरीचे वर्णन, मॉरिसमधील प्रेक्षणीय स्थळे, तेथील ऐतिहासिक माहिती याचेही विवेचन केले आहे. याशिवाय तेथील मराठी भाषेचे शिक्षण, अभ्यासक्रम, बुद्धिस्ट सोसायटीची माहिती, मॉरिशस आणि भारताचे नातेसंबंध, तेथील श्रद्धा, सण-उत्सव, रुढी-परंपरा, संस्कृती आणि तेथे भेटलेल्या व्यक्ती, त्यांची व्यक्तिचित्रणे त्यात आली आहेत. चित्रदर्शी वर्णन, मार्मिकपणा, सखोल निरीक्षण ही या पुस्तकाची वैशिष्ट्य आहेत. एकंदरीत हे प्रवासवर्णन मराठी साहित्यात मोलाची भर टाकते.

**एकांकिका लेखन**

उर्मिला पवार यांनी कथा प्रवासवर्णन व आत्मकथनाबरोबरच दोन एकांकिकाही लिहिलेल्या आहेत 'इलास पाहुण्यानू बसा बसा' ही एकांकिका मालवणी भाषेत लिहिली आहे. तर 'मुक्ती' ही मराठी भाषेत लिहिली आहे. या दोन्ही एकांकिका त्यांच्या नाट्यगुणांचा आविष्कार घडविणाऱ्या आहेत.

'इलास पाहुण्यांनू बसा बसा' या एकांकिकेत मालवणी मुलखातील इरसाल कोकणी माणसांच्या जीवन वास्तवाला तितक्याच इरसालपणे शब्दांकित केले आहे. त्यांनी कधी तिरकसपणे तर कधी सरळ या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

पद्धतीने लेखन केले आहे. त्यांची ही भाषा वाचकाच्या हृदयाला जाऊन भिडणारी आहे. विनोद असूनही समाचार घेणारी व मालवणी बोलीचा वापर केला आहे.

'मुक्ती' या एकांकिकेत पश्चातापाने होरपळलेल्या एका श्रमणीची आणि विदुषीची ही कथा नाट्यरूपाने सादर केली आहे. ही कथा बौद्ध आणि जैन काळात घेऊन जाणारी, तेथील तत्कालीन समाजव्यवस्थेवर नेमके लक्ष केंद्रित करणारी आहे. या एकांकिकांचे वैशिष्ट्य म्हणजे सूक्ष्म निरीक्षण, व्यक्तिरेखा मधील विविधता, मार्मिक संवाद, उपरोधिक भाषा, वास्तवता, नाट्यमयता, चिंतनशीलता, इत्यादी वैशिष्ट्ये जाणवतात. अशा या दोन वेगवेगळ्या प्रकारच्या वेगवेगळ्या बोलीत साकारलेल्या एकांकिका आहेत

याखेरीज उर्मिला पवार यांनी भाषांतरित साहित्यही लिहिले आहे. ते 'उदान' नावाने प्रसिद्ध आहे. तसेच 'आम्हीही इतिहास घडविला' हा संशोधनात्मक ग्रंथ निर्माण केला आहे. सदर संशोधनात्मक पुस्तक आंबेडकरी चळवळ आणि तत्त्वज्ञानासंदर्भात लिहिला आहे. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत आणि धर्मांतराच्या काळात तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळानंतर ज्या कर्तृत्ववान महिलांनी सहभाग घेतलेला आहे. त्यांचा लेखाजोखा या पुस्तकात केला आहे. संकलनात्मक संशोधनाच्या स्वरूपात हा ग्रंथ त्यांनी निर्माण आहे.

**आत्मकथनात्मक साहित्य : आयदान**

उर्मिला पवार या खऱ्या नावारूपाला आल्या त्या 'आयदान' या आत्मकथनामुळेच. आयदान हे त्यांच्या जीवनातील अनुभव कथन करणारे पुस्तक आहे. स्वतःच्या जीवनाबरोबरच जातीच्या, प्रदेशाच्या अनुषंगाने सांस्कृतिक दर्शन घडवणारे आत्मकथन ठरले आहे.

'आयदान' हे अतिशय लक्षणीय असणारे आत्मकथन आहे यात स्त्री जीवनाच्या दुःखाचा शोध घेतला आहे एक स्त्री म्हणून समाजाने आणि संस्कृतीने लादलेले दुःख आणि दुसरे म्हणजे दलित म्हणून वाट्याला येणारे दुःख अशा दुहेरी अवस्थेत सापडलेल्या स्त्रीची ही कहाणी आहे. पुरुष संस्कृती तिची होणारी अवहेलना, तिला होणाऱ्या वेदना आणि तिच्याबद्दल निर्माण केलेल्या प्रतिमा आणि टाकलेली बंधने यात गुदमरणाऱ्या मनाचा हा शोध आहे तसेच यातच स्वकेंद्रीत बरोबर विविध जातीचे प्रश्न, ग्रामीण समाज, स्त्री प्रश्न, सामाजिक वास्तव, दलितांचे जीवनदर्शन, स्त्री-पुरुष भेद अशा कितीतरी विषयांना स्पर्श करणारे हे आत्मकथन आहे. अशी विविधांगी लेखन करणाऱ्या या लेखिका आहेत. आयदान संदर्भात डॉ. महेंद्र भवरे यांनी म्हटले आहे की, "उर्मिला पवार यांचे आयदान हे आत्मकथन एकूणच आत्मकथनांच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे वाट्याला आलेल्या दुःखाचे भांडवल करण्यापेक्षा पुढयातील वास्तव स्वीकारण्याचे आणि दुःखावर मात करून पुढे पुढेच जायचे असा प्रवास आयदानमध्ये चित्रित झाला आहे आणि हा प्रवास व्यवस्था आणि व्यवस्थेची मूल्ये हास्यास्पद ठरवीत झालेला आहे. हे लक्षात घेणे गरजेचे आहे. अंतर्मुख होऊन जीवनाचे केलेले परीक्षण, चळवळीचे निरीक्षण, चळवळीच्या मर्यादा, पुरुषांचा दुटप्पीपणा, कोकणातील कष्टकरी स्त्रियांचे जीवन, वास्तवता, सांस्कृतिक जीवनातील अंतर्विरोध अशा अनेक विषयांना मुखरीत करीत हे आत्मकथन आयदान पुढे सरकत राहते."(२) या विधानातच आयदानचे मोठेपण सामावलेले आहे.

**साहित्याची वैशिष्ट्ये**

१. सामाजिकता हे उर्मिला पवार यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

२. स्त्रियांच्या जीवनावर लक्ष केंद्रित करणारे, स्त्री वेदनेला महत्त्व देणारे हे साहित्य आहे.
३. आशयाच्या दृष्टीने विचार केला तर विस्तृत पट निर्माण करणारे हे साहित्य आहे
४. आंबेडकरी विचारांचा पुरस्कार करणारे हे साहित्य आहे.
५. अन्याय, अत्याचार शोषण सर्वांबद्दल जाणीव निर्माण करून त्या मुकुटपणे सहन न करता त्याविरुद्ध बंड करण्याची जाणीव करून देणारे हे लेखन आहे.
६. स्व चा शोध घेण्याची सतत धडपड करत असलेले हे साहित्य आहे.
७. स्व आणि सहअनुभव यांची आविष्कृती करणारे हे साहित्य आहे.
८. केवळ एका स्त्रीचे, व्यक्तीचे अनुभव असले तरी ते तिचे न राहता सर्व स्त्री जातीचे अनुभव बनताना दिसतात.
९. या साहित्यातून ग्रामीण, प्रादेशिक भाग जिवंतपणे साकार झाला आहे.
१०. एकाच भू-भागातील धर्म, जात, शिक्षण, भाषा, वगैरे सारख्या घटकातील विविधता, सांस्कृतिकता प्रकट करणारे हे साहित्य आहे
११. प्रस्तुत साहित्य मनोरंजनात्मक किंवा काल्पनिक नाही तर भीषण वास्तवासह चित्रित झाले आहे. ते अनुभवाचे बोल आहेत ते वास्तववादी जीवन प्रकट करणारे साहित्य आहे.
१२. एकंदरीत सर्व दृष्टीने परिवर्तन घडविण्यास निघालेले प्रेरक विचारांचे हे मौलिक स्वरूपाचे लेखन आहे.

**संदर्भ**

१. कार्व्हालो सिसिलिया- आयदान : सांस्कृतिक ठेवा- संपा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो,सतीश काळसेकर लोकवाङ्मय गृह मुंबई, प्रथम आवृत्ती जून २००७, पृ. ६०-७०
२. भवरे महेंद्र - सांस्कृतिक ठेवा- संपा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो, सतीश काळसेकर लोकवाङ्मय गृह मुंबई, प्रथम आवृत्ती जून २००७, पृ. १३५


Copyright © | JET Network, All Rights Reserved